अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# भारतात मनुष्यजीवाचे मोलच नाही

आपल्या देशात एकूणच मनुष्यशक्तीचा गंभीरपणे विचार होत नाही. हे केवळ देशातल्या बेरोजगारीच्या प्रश्नावरून तर सिध्द होते, परंतु याहीपेक्षा भारतामध्ये मनुष्याच्या जीवाचे मोल उरलेले नाहीत. मग ती हिमाचल प्रदेशात बियास नदीत पंचवीस विद्यार्थी वाहून जाण्याची घटना असेल किंवा देशभरात वेगवेगळ्या रस्ते आणि रेल्वे अपघातांमध्ये दरवर्षी किमान एक लाख लोक मृत्युमुखी पडण्याचा गंभीर प्रश्न असेल. ज्या वेगाने आणि प्रमाणामध्ये निदान भारतात तरी मनुष्यहानी होते ती पाहिल्यावर इतक्या प्रचंड प्रमाणात देशातल्या लोकांना अगदी छोट्या-छोट्या कारणांवरून जीव गमवावे लागत असतील तर ती अत्यंत गंभीर समस्या म्हटली पाहिजे. हिमाचलची घटना तर शासन-प्रशासन आणि जनतेलासुध्दा गंभीरपणे विचार करायला लावणारी ठरते. हैद्राबादमधल्या एका अभियांत्रिकी कॉलेजचे विद्यार्थी इंडस्ट्रीयल व्हिजीटच्या नावाखाली सिमला कुलुमनालीच्या सहलीला आले होते आणि तिथल्या मंडी या शहरापासून दहा किलोमीटरच्या पंडोह इथल्या नदीच्या पात्रात हे विद्यार्थी फोटो काढण्यासाठी गेले. नदीच्या वरच्या भागात असलेल्या लार्जी डॅममधून अचानक पाणी सोडण्याचा बेजबाबदार प्रकार घडला आणि कोणतीही कल्पना नसताना केवळ आपल्या आयुष्याचा आनंदाचा क्षण उपभोगणाऱ्या थोड्या-थोडक्या नव्हे तर तब्बल पंचवीस विद्यार्थ्यांना आपल्या प्राणाला मुकावे लागले. हे विद्यार्थी नदीच्या पात्रात का उतरले हा प्रश्न जितका गंभीर ठरतो, त्यापेक्षाही कोणतीही पूर्वसूचना न देता एखाद्या नदीच्या पात्रात शेजारच्या धरणामधून जर अचानकपणे पाणी सोडले जात असेल तर तो प्रकार यापेक्षाही गंभीर ठरतो. बियास नदीच्या प्रवाहाला प्रचंड वेग असतो. आजुबाजूला प्रचंड उंचीच्या पर्वतरांगा आणि त्यामधून वाहणारी ही नदी कोणत्याही पर्यटकांचे लक्ष वेधून घेते. मुळातच हिमाचलचे नैसर्गिक सौंदर्य देशातल्याच नव्हे तर जगातल्या कोणत्याही पर्यटकाला आकर्षित करणारे आहे. अशाच मोहापायी हे विद्यार्थी नदीच्या पात्रात असलेल्या एका उंच खडकावर उभे राहून फोटो काढण्याचा आनंद लुटत होते. परंतु काही क्षणाचा खेळ झाला आणि प्रचंड वेगाने आलेल्या या पाण्याने जीवनाच्या महत्वाच्या टप्प्यात प्रवेश करणाऱ्या या तरुणांना काळाने ओढून नेले. अंगावर काटे आणणारा हा प्रकार एकूणच पर्यटकांसाठी डोळ्यात अंजन घालणारा ठरतो. तर सरकार एकूणच मनुष्याच्या प्राणहानीकडे किती निर्लज्जपणे दुर्लक्ष करते हेदेखील तितक्याच गंभीरपणे स्पष्ट होते.

## हिमाचल सरकारचा अक्षम्य गुन्हा

हैद्राबाद इथल्या कॉलेज विद्यार्थ्यांनी नदीच्या पात्रात जाऊन चूक केली किंवा नाही हा प्रश्न इथे महत्त्वाचा ठरत नाही. या घटनेमुळे काही मुलभूत प्रश्न निर्माण झाले आहेत. कारण याच काळात उत्तरकाशीमध्येसुध्दा दोन परदेशी पर्यटकांचा असाच अपघाती मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. हिमाचल, उत्तरांचल एवढेच नव्हे, तर काश्मिर किंवा उत्तर भारताचा बराचसा भाग हा पर्यटनासाठी प्रसिध्द आहे. हिमाचल, उत्तरांचल यांचे अर्थकारण केवळ पर्यटनावरच अवलंबून आहे. निसर्गाने मुक्तहस्ते या प्रदेशाला वरदान दिलेले आहे. नगाधिराज हिमालयाच्या बर्फाच्छादित पर्वतांच्या रांगा पाहण्यासाठी देशच नव्हे तर जगाच्या गावपातळीवरच्या अनेक भागांतून लाखो पर्यटक हिमाचलमध्ये येतात. रोहतांग किंवा धर्मशाळा परिसरातल्या हिमगिरींचा आनंद उपभोगण्याची पर्यटकांची इच्छा असते. नद्या, डोंगर किंवा हे बर्फाने माखलेले पर्वत नक्कीच पर्यटकांचे लक्ष वेधतात. विशेषत: उन्हाळ्याच्या काळात सिमला, कुलुमनाली, लेहलडाख काश्मिर या भागात अक्षरश: किमान एक कोटीच्या घरामध्ये, पर्यंत रोज येतात. इतक्या मोठ्याप्रमाणावर पर्यटक ज्या भागामध्ये जातात त्याठिकाणी त्या पर्यटकांची काळजी घेण्याची नैतिक जबाबदारी राज्य सरकारांनी पाळली पाहिजे. आज आपल्या स्वत:च्या भरोशावर पर्यटकांना अनेक गोष्टी कराव्या लागतात. हिमाचलमधली दुर्घटना ही तिथल्या स्थानिक सरकारच्या बेजबाबदार आणि बेफिकीरपणाचे ज्वलंत उदाहरण ठरते. आज अगदी थेट चंदीगढपासून ते सिमला, मनालीपर्यंत किंवा ज्याठिकाणी रोज किमान एक लाख पर्यटक जाऊन धडकतात त्या रोहतांग परिसरापर्यंत हिमाचल प्रदेश सरकारची कोणतीही सहाय्यता केंद्रे दिसत नाहीत. शेकडो मैल घाटाघाटातून प्रवास करतानासुध्दा पोलीसचौक्या किंवा कोणतेही मदतपथक पहायला मिळत नाही. अत्यंत अरुंद रस्ते आणि एकीकडे खोल दरी अशा बिकट वाटेतून प्रवास करणाऱ्या पर्यटकांवर केव्हाही कोणताही प्रसंग ओढवू शकतो. परंतु अशी आधुनिक पध्दतीने सज्ज असलेली मदत केंद्रेच आज हिमाचल प्रदेशमध्ये दिसत नाहीत. ज्याठिकाणी या पंचवीस हरहुन्नर तरुणांना प्राण गमवावे लागले, त्या पंडोहत परिसरात जर आधुनिक पध्दतीने सज्ज असलेली केंद्रे असती तर निश्चितच ताबडतोब हालचाली होऊन पाण्याचा प्रवाह थांबवता आला असता आणि याच मदत केंद्रातल्या जवानांच्या मदतीने पुढच्या दोन तासामध्ये दहा पंधरा विद्यार्थ्यांचे प्राण नक्कीच वाचू शकले असते. खरे तर या सगळ्या मार्गावर सुसज्ज असे मदत केंद्र तातडीने उभारले पाहिजे. त्यामध्ये पाण्यात पोहणारे जवानांपासून ते अपघात झाल्यानंतर ज्या-ज्या गोष्टींची तातडीने गरज असते अशा सुविधांची उपलब्धता झाली पाहिजे. सर्वात महत्वाचे म्हणजे आजच्या माहिती तंत्रज्ञान युगामध्ये ताबडतोब संपर्क साधण्याची व्यवस्था झाली पाहिजे. ज्या अभियांत्रिकी ज्ञानाचा अभ्यास हे विद्यार्थी करीत होते. देशाची किंवा समाजाची हे तरुण म्हणजे एक शक्तीच होती. परंतु त्यांनी मिळवलेल्या या ज्ञानाचा आणि त्यांच्यातील गुणवत्तेला शासकीय बेजबाबदारपणा कारणीभूत ठरला. याची अतिशय गंभीर दखल नरेंद्र मोदी यांनी घेतली पाहिजे.

## आपतकालीन व्यवस्थाच नाही

अनेक वेळेला पर्यटक स्वत:च्या गाड्या करून देशाच्या विविध भागामध्ये फिरतात. अनेक वेळेला पूर्ण बसच्या बस अपघातग्रस्त होऊन एकाच वेळी चाळीस-चाळीस पर्यटकांचा बळी जाण्याचा प्रकारही घडतो. याशिवाय देशाच्या प्रत्येक भागामध्ये रस्ते अपघातांमध्ये रोज किमान एक हजार लोकांना आपल्या प्राणाला मुकावे लागते. अगदी जिल्हा आणि गावपातळीवरच्या रस्त्यांवर छोटे-मोठे अपघात घडतात. त्यात होणारी मनुष्यहानी कोणाच्याही लक्षात येत नाही. केवळ सरकारी उदासिनतेमुळे आणि बेजबाबदारपणामुळे हे नुकसान होते. त्याचे प्रमाण कमी करण्यासाठी आपतकालीन यंत्रणा कायमसाठी सज्ज ठेवल्या पाहिजेत. तरच मनुष्याच्या जीवाचे मोल आपण ओळखले असे म्हणता येईल.